MHAH220012972011

<u>नियमित दिवाणी दावा क्र.३३५/२०११</u>
विठ्ठल राजाराम लबडे वि. राजाराम श्रीधर व इतर

## आदेश
**(नि.क्र.५७ खाली)**

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दावा दुरुस्तीकामी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द वाटप व पृथ्थक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये तांत्रीक अडचण निर्माण झाल्यामुळे दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ सोनाली दत्तात्रय नलवडे ऐवजी सोनाली दत्तात्रय लबडे व प्रतिवादी क्र. ९ रावसाहेब तुकाराम लबडे ऐवजी रावसाहेब तुकाराम वडवकर तसेच प्रतिवादी क्र. १० भाऊसाहेब तुकाराम लबडे ऐवली भाऊसाहेब तुकाराम वडवकर अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच वादीचे दाव्यास जरुरी त्या पक्षकाराची उणीव राहु नये म्हणुन प्रतिवादीपणात प्रतिवादी क्र. १५ गणेश दादा वडवकर, प्रतिवादी क्र.१६ राहुल आबासाहेब वडवकर, प्रतिवादी क्र. १७ संजय चंद्रकांत वडवकर, प्रतिवादी क्र. १८ कुसुम संजय वडवकर, प्रतिवादी क्र. १९ किरण दत्तात्रय लबडे, प्रतिवादी क्र. २० कुसुम राधाकृष्ण पुराणे व प्रतिवादी क्र. २१ जालींदर विठ्ठल लाढाणे यांना सामिल करणेसाठी वादीने विनंती केली आहे.

४. वादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा कलम १अ मधील मिळकतीचे क्षेत्रापैकी स.नं. १९८ पैकी ०.४० आर ऐवजी ०.४१ आर, स.नं. १९८ पैकी ०.६० आर एकुण १हे. १ आर, स.नं. २१२ पैकी ०.४२ आर ऐवजी ०.४२ आर, पो.ख. ०.३७ आर एकुण ०.७९ आर, स.नं. ९१+९२/२ पैकी पैकी ०.५३ आर ऐवजी ०.५३ आर, पो.ख. ०.०३ आर एकुण ०.५६ आर तसेच दावा कलम १ब मध्ये स.नं. २४/१ पैकी ०.६० आर ऐवजी ०.६० आर पो.ख. ०.०२ आर एकुण ०.६२ आर, स.नं. ९१+९२/३ पैकी ०.३० आर ऐवजी ०.३१ आर व पो.ख. ०.०२ आर एकुण ०.३३ आर अशी दुरुस्ती करण्याची वादीने परवानगी

मागितली आहे.

५. वादीने पुढे असे कथन केले आहे की, दावा कलम ४ यास दावा कलम ४अशी दुरुस्ती होऊन दावा कलम ४ब मध्ये वरील दुरुस्तीच्या अनुशंगाने अर्जात नमुद केल्याप्रमाणे मजुकर सामाविष्ट करण्याची वादीने विनंती केली आहे. तसेच दावा कलम ९अ यास ९अ१ करुन अर्जात नमुद केल्याप्रमाणे ९अ२ मधील मजकुर सामाविष्ट करण्याची वादीने विनंती केली आहे. वादीने पुढे असे कथन केले आहे की, वरीलप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यास दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणत्याही प्रकारे बदल होत नाही अगर सदर दुरुस्तीने प्रतिवादी यांचे कोणतेही हक्क हिराऊन घेतले जात नाहीत. त्यामुळे वरीलप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची वादीने परवानगी मागितली आहे.

६. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि.क्र. ५८ खाली सदर अर्जास म्हणणे दिले आहे व असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील मिळकतीचे वर्णन व दुरुस्ती अर्जातील गटांचे वर्णन वेगळे आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती कायदेशीर नाही. मुळ दाव्याच्या बाहेर जाऊन वादीला दुरुस्ती मागण्याचा अधिकार नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पुढे असे कथन केले आहे की, दावा कलम १अ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती या प्रतिवादी क्र. १ यांच्या खरेदी मालकीच्या आहेत. सदर मिळकती प्रतिवादी क्र. १ यांनी खरेदीखताने विकत घेतलेल्या असून त्या त्यांच्या स्वकष्टार्जित उत्पन्नातील मिळकती आहेत. त्यापैकी गट क्र. ९१+९२ क्षेत्र ०.५३ आर व गट क्र. २१२ पैकी ०.४२ आर क्षेत्र जालिंदर विठ्ठल लाढाने यांना त्यांच्या आर्थिक अडचणी करिता विक्री केलेल्या आहेत. दावा कलम १ ब मध्ये वर्णन केलेल्या मिळकती या प्रतिवादी क्र. २ दत्तात्रय राजाराम लबडे यांनी स्वकष्टातून विकत घेतलेल्या मिळकती असल्याने सदरच्या मिळकती या प्रतिवादी क्र. २ यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पुढे असे कथन केले आहे की, मौजे खंडेश्वरी येथील गट क्र. १९८ पैकी ०.६० आर क्षेत्र किरण दत्तात्रय लबडे यांनी स्वतः कष्टातून दि. १७/०८/२०२३ रोजी खरेदीखताने विकत घेतलेले क्षेत्र आहे. त्यामुळे सदरचे क्षेत्र दाव्यात घेण्याचा व सदर किरण दत्तात्रय लबडे यास प्रतिवादी करण्याचे काही कारण नाही. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपात पुर्णपणे बदल होत असल्यामुळे सदर वादीचा दुरुस्ती अर्ज नामंजुर करण्यात यावा. इतर प्रतिवादींनी सदर अर्जास

म्हणणे दिले नसल्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याविरुध्द विनाम्हणणे चालविण्यात आला.

७. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, सदरचा दावा सन २०११ साली दाखल केला आहे. दावा अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. ३, ९ व १० यांच्या नावात दुरुस्ती करावयाची आहे. तसेच दावा मिळकतीमधील क्षेत्रामध्ये देखील दुरुस्ती करावयाची आहे. अशी दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही फरक पडणार नाही. वादीचे असे म्हणणे आहे की, दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र दाव्यातील पक्षकार यांनी त्रयस्थ व्यक्तींना हस्तांतरीत केली आहे. त्यामुळेच अर्जात नमुद केलेल्या त्या व्यक्तींची नावे प्रतिवादीपणात असणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये सदरचे क्षेत्र हस्तांतरीत झालेले नाही असे कथन केले नाही. प्रतिवादींनी कथन केले आहे की, खरेदीखतान्वये घेतलेले क्षेत्र स्वकष्टार्जित उत्पन्नातून घेतलेले असल्याने सदरचे क्षेत्र व व्यक्तींची नावे दाव्यात सामाविष्ट करु नये. परंतु अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा वाटपाचा आहे. दावा प्रलंबित असताना वादमिळकतीपैकी क्षेत्र हस्तांतरीत झालेले आहे. त्यामुळे अर्जात विनंती केल्याप्रमाणे दुरुस्ती वादीला करावयाची परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी यांनी उपस्थित केलेला बचाव त्यांना दाव्याच्या संपरिक्षेच्यावेळेस घेता येईल. प्रथमदर्शनी प्रतिवादींच्या नावात दुरुस्तीची परवानगी दिल्यास तसेच वादमिळकतीच्या क्षेत्रात दुरुस्ती केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुपही बदलणार नाही त्यामुळे दावा दुरुस्तीचा वादीचा अर्ज मंजुर करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. वादीने सदरचा अर्ज विलंबाने दिल्यामुळे वादीने प्रतिवादीला खर्च देणे गरजेचे आहे. म्हणून मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) नि.क्र.५७ वरील अर्जात वादीने नमुद केलेली दुरुस्ती वादीला करण्याची परवानगी देण्यात येत आहे व त्याबद्यलची दुरुस्ती वादीने पुढील तारखेपर्यंत करावी.

३) वादीने सदरचा अर्ज विलंबाने दिल्यामुळे वादीने आक्षेप घेणारे प्रतिवादींना खर्च म्हणुन रक्कम रुपये ५००/- (रुपये पाचशे मात्र) देण्यात यावे.

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.12.15 16:18:36 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :१५/१२/२०२५.